# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:29.09.2024** **वारःरविवार**

---

**ठळक बातम्या**

१. दिव्यांग कलाकार आणि उद्योजकांच्या दिव्य कला मेळाव्याला पुण्यात सुरवात

२. ज्येष्ठ नागरिकांसाठीच्या मुख्यमंत्री तीर्थदर्शन योजनेचा मुख्यमंत्र्यांच्या हस्ते प्रारंभ

३. आकाशवाणीच्या मन की बात मधून पंतप्रधान साधणार जनतेशी संवाद

आणि

४. राज्यात अनेक ठिकाणी पावसामुळे शेतीचं मोठ्या प्रमाणावर नुकसान

**दिव्यांग मेळावा**

विकसित भारताचं स्वप्न साकार करण्यात दिव्यांगांचं मोठे योगदान असणार आहे. त्यामुळे दिव्यांगाना सहानुभूती नव्हे तर प्रोत्साहन देण्याची गरज असल्याचं प्रतिपादन केंद्रीय सामाजिक न्याय आणि सशक्तिकरण मंत्री डॉक्टर विरेन्द्र कुमार यांनी काल पुण्यात केलं. केंद्रीय सामाजिक न्याय विभागाच्या वतीनं व्होकल फॉर लोकल या संकल्पने अंतर्गत सांगवीतील पीडब्ल्यूडी मैदानावर दिव्य कला मेळाव्याचं आयोजन करण्यात आलं आहे, याचं उद्घाटन डॉक्टर वीरेंद्र कुमार यांच्या उपस्थितीत झालं त्यावेळी ते बोलत होते. यावेळी राज्यपाल सी. पी राधाकृष्णन, खासदार श्रीरंग बारणे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

दिव्यांग उद्योजकांना मुख्य प्रवाहात येण्यासाठी समाजानं पुढाकार घेतला पाहिजे. दिव्य कला मेळावे दिव्यांगांच्या जीवनात बदल घडवण्यासाठी आवश्यक असल्याचं राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन आपल्या भाषणात म्हणाले.

या मेळाव्यात दिव्यांग कलाकार आणि उद्योजक आपल्या वस्तू आणि सेवांसह सहभागी झाले आहेत. हा मेळावा 6 ऑक्टोबरपर्यंत चालणार आहे. यात शेवटच्या दिवशी दिव्य शक्ती कार्यक्रम होणार आहे.

**मुख्यमंत्री तीर्थदर्शन**

आपल्या वडीलधाऱ्या मंडळींच्या आयुष्यात आनंद आणि समाधानाचे क्षण आणण्याची जबाबदारी आपलीच आहे. याच भावनेतून आपण राज्यातील सर्व धर्मिय 60 वर्षांवरील ज्येष्ठांसाठी सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य विभागामार्फत 'मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजना' सुरु केल्याचं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ई-संदेशाद्वारे सांगितलं. काल त्यांच्या हस्ते 'मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजने'चा राज्यस्तरीय ई- शुभारंभ पार पडला. यावेळी कोल्हापूर इथं पालकमंत्री हसन मुश्रीफ यांनी हिरवा झेंडा दाखवून पहिली विशेष रेल्वे गाडी रवाना केली. 800 तीर्थयात्री दर्शनासाठी या विशेष गाडीनं मार्गस्थ झाले. या योजनेचा शुभारंभ कोल्हापूरमधून होत असल्याचा आणि ही विशेष गाडी योध्येसाठी रवाना होत असल्याचा मनापासून आनंद होत आहे असं मुख्यमंत्री आपल्या संदेशात म्हणाले. या तीर्थयात्रेत सहभागी होणाऱ्या सर्व ज्येष्ठांचे त्यांनी अभिनंदन केलं आणि त्यांना शुभेच्छा दिल्या. भारतातील 73 आणि आपल्या राज्यातील 66 तीर्थक्षेत्रांचा योजनेमध्ये समावेश आहे.

**निवडणूक आयोग**

राज्यात आगामी निवडणुकीच्या तयारीचा आढावा घेण्यासाठी निवडणूक आयोगाचं पथक दोन दिवसांच्या महाराष्ट्र दौऱ्यावर आहे. या तयारीचा आढावा घेतल्यानंतर या पथकाने काल मुंबईत पत्रकार परिषद घेतली. निष्पक्ष आणि निर्भय वातावरणात निवडणुका पार पाडण्यासाठी सर्व यंत्रणा सज्ज असल्याचं यावेळी मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांनी सांगितलं. शहरी भागातल्या जवळपास 100 टक्के आणि ग्रामीण भागातल्या 50 टक्के मतदान केंद्रावर web casting ची सुविधा दिली जाणार आहे. जनतेनं उत्साहानं या मतदानाच्या उत्सवात सहभागी व्हावं असं ते म्हणाले. 19 लाखांहून अधिक नव मतदार नोंदणी झाल्याचं आणि महिलांचा टक्का वाढल्याची माहिती त्यांनी यावेळी दिली.

**मन की बात**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज आकाशवाणीच्या मन की बात या कार्यक्रमाद्वारे सकाळी अकरा वाजता देशवासियांशी संवाद साधणार आहेत. हा या कार्यक्रमाचा 114 वा भाग आहे. हा

कार्यक्रम आकाशवाणीच्या सर्व केंद्रांवरून आणि दूरदर्शन वाहिनीवरून प्रसारित होईल. Newsonair डॉट gov डॉट in हे संकेतस्थळ तसंच न्यूज ऑन एअर या मोबाईल ऍपवरही हा कार्यक्रम प्रसारित केला जाईल. आकाशवाणी आणि दूरदर्शनचे यूट्यूब चॅनल, प्रधानमंत्री कार्यालय तसंच माहिती आणि प्रसारण मंत्रालयाच्या यूट्यूब चॅनलवर या कार्यक्रमाचं थेट प्रसारण केलं जाणार आहे. या प्रसारणानंतर लगेचच प्रादेशिक भाषांमध्ये हा कार्यक्रम प्रसारित केला जाईल.

**सांगली पुरस्कार**

चतुर्थ माझी वसुंधरा अभियान अंतर्गत जिल्हा परिषद सांगलीचा राज्यात प्रथम क्रमांक आला असून जिल्हा परिषद सांगली अंतर्गत 16 ग्रामपंचायतींना 9 कोटी 20 लाखाचे पुरस्कार मिळाले आहेत. या यशाबद्दल आकाशवाणीशी बोलताना मुख्य कार्यकारी अधिकारी तृप्ती धोडमिसे म्हणाल्या...

**पाऊस-नुकसान**

राज्यात मंगळवारी आणि बुधवारी झालेल्या पावसामुळे 12 जिल्ह्यांमध्ये शेती पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. सोयाबीन, कांदा, भाजीपाला, मका, बाजरी, मूग, उडीद, भुईमूग या पिकांना फटका बसला आहे.  अतिवृष्टीमुळे बारा जिल्ह्यांमधील सुमारे  33 हजार हेक्टरवरील पिकांचं नुकसान झालं आहे असा प्राथमिक अंदाज  पुणे कृषी आयुक्तालयाकडून व्यक्त करण्यात आला आहे. सर्वाधिक 8 हजार हेक्टरवरील नुकसान एकट्या बीड जिल्ह्यामध्ये झाले आहे. अतिवृष्टीमुळे राज्यातील 17 जिल्ह्यांमधील 114 मंडळांमध्ये 65 मिलिमीटरपेक्षा जास्त पावसाची नोंद करण्यात आली आहे. उडीद, मूग पिकाची काढणी झाली असून उघडीप मिळाल्यानंतर उत्पादन हाती येणार आहे. मात्र, पावसाची हजेरी कायम असल्याने शेतकऱ्यांनी अद्याप मळणी केलेली नाही.  बाजरी पीकही अंतिम टप्प्यात असून पाऊस कायम राहिल्यास बाजरीचंही नुकसान होण्याची भीती आहे. कापूस पिकाला हा पाऊस दिलासादायक असून यामुळे उत्पादनात वाढ होण्याची शेतकऱ्यांना आशा आहे.

**पुणे विद्यापीठ**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुनरुत्थान समरसता गुरुकुलम, भारतीय लोककला अभ्यास संशोधन आणि कल्याण केंद्र तसंच भाषा आणि साहित्य प्रशाला यांच्या संयुक्त विद्यमाने पद्मश्री डॉक्टर प्रभाकर मांडे यांच्या साहित्यावर दोन दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन चिंचवड इथं करण्यात आलं आहे. चर्चासत्रात पहिल्या दिवशी डॉ. मांडे लिखित मौखिक परंपरा, लोकरंगभूमी या पुस्तकांवर परिसंवाद झाले तर आज दुसऱ्या दिवशी लोककला, भारतीय संस्कृती, भारतीय शिक्षण परंपरा आदि विषयांवरील साहित्यावर आधारित परिसंवाद होणार आहेत. लोकसाहित्य क्षेत्रातील अनेक विद्वान येथे उपस्थित असून अभ्यासक्षेत्राची सखोल चर्चा होणार आहे.

**ऑक्सिजन-बर्ड-पार्क**

नागपुरातील ऑक्सिजन बर्ड पार्कच्या माध्यमातून नागरिकांना परिसंस्था आणि पर्यावरणाचं महत्त्व कळेल अशी अपेक्षा केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी काल नागपूरजवळ जामठा इथल्या ऑक्सिजन बर्ड पार्क म्हणजे अमृत महोत्सव उद्यानाचं उद्घाटन करताना व्यक्त केली. पक्ष्यांना त्यांच्या नैसर्गिक अधिवासाची सोय उपलब्ध व्हावी आणि स्थानिक नागरिक तसंच पर्यटकांसाठीही दिलासा देणारे नैसर्गिक ठिकाण उपलब्ध होईल अशा रितीनं 8 हेक्टरमध्ये हे उद्यान विकसित केलं आहे.

**महिला-साहित्यिक-संमेलन**

महिलांनी मनाने खंबीर झालं तर सगळे मदतीला येतात असा सल्ला एसएनडीटी विद्यापीठाच्या कुलगुरु डॉक्टर उज्ज्वला चक्रदेव यांनी नवी मुंबईत सानपाडा इथं आयोजित महिला साहित्यिक संमेलनात काल दिला. यावेळी लेखिका स्वाती काळे, छत्रपती शिक्षण मंडळाचे पदाधिकारी, अखिल भारतीय साहित्य परिषद कोकण संघटन मंत्री नितीन केळकर, आदि मान्यवर उपस्थित होते. कथाकथन, माझा आवडता लेखक, माझे कादंबरी लेखन, वृंदा टिळक यांचं व्याख्यान तसंच कविता सादरीकरण असे अनेक कार्यक्रम या संमेलनात सादर झाले.

**कॅरम**

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील कुडाळ मध्ये काल पालकमंत्री राज्य मानांकन कॅरम स्पर्धेला सुरुवात झाली. या स्पर्धेमध्ये पुरुष गटामध्ये 148 तर महिला गटामध्ये 32 खेळाडू खेळत आहेत. विश्वविजेता संदीप दिवे, योगेश परदेशी, माजी विश्व विजेता प्रशांत मोरे, आशिया कप विजेता महम्मद घुफ्रान हे या स्पर्धेत सहभागी झाले आहेत. पुरुष गटात पुण्याच्या अनिल मुंढे याला तर महिला गटात मुंबईच्या काजल कुमारी हिला पहिलं मानांकन देण्यात आलं आहे. 30 सप्टेंबरला या स्पर्धेची सांगता होणार आहे.

**क्रिकेट**

कानपूर क्रिकेट कसोटीत काल दुसऱ्या दिवशी पावसामुळे खेळ होऊ शकला नाही. प्रथम फलंदाजी करताना पाहुणा बांग्लादेश संघाच्या 3 गडी बाद 107 धावा झाल्या आहेत.

**हवामान**

कोकणात बऱ्याच ठिकाणी, मध्य महाराष्ट्र आणि विदर्भात काही ठिकाणी तर मराठवाड्यात तुरळक ठिकाणी पावसाची शक्यता असल्याचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.**